# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकमत पुणे, मंगळवार, दि. २२ ऑगस्ट २०१७ ७

### राजगुरुनगरला डेंगी, मलेरियाविरोधी जनजागृती रॅली : रासयोचे २०० स्वयंसेवक सहभागी

# कोरडा दिवस पाळा-रोगराई टाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : खेड तालुक्यात डेंगी, मलेरिया, चिकुनगुनिया व तापाच्या साथीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन समाजाचे प्रबोधन करण्यासाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने शहरात डेंगी, मलेरिया विरोधी जनजागृती रॅली काढण्यात आली. यात रासयो विभागाचे २०० स्वयंसेवक सहभागी झाले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राजगुरू नगर परिषद आणि प्राथमिक आरोग्य केंद्र राजगुरुनगर यांच्या वतीने ही रॅली काढण्यात आली.

रॅलीचा शुभारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. डी. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, नगरसेवक मनोहर सांडभोर, सचिन मधवे, प्रा. दिलीप मुळूक, गणेश देवाकर उपस्थित होते.




राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डेंगी-मलेरियाविरोधी जनजागृती रॅली काढली होती.

बुट्टे-पाटील यांनी हवामानातील बदलामुळे साथीच्या आजारांचे प्रमाण वाढले असून, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेसंदर्भात सर्वांनी काळजी घेण्याचे आवाहन केले. रॅली बस स्थानक, बाजारपेठ, नगर परिषद यामार्गे तहसील कार्यालयापर्यंत आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी घोषणा, पथनाट्याद्वारे जनजागृती केली.

रॅलीच्या समारोपप्रसंगी बोलताना प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. उदय पवार यांनी साथीच्या आजारांचे निर्मूलन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावोगावी जाऊन लोकांचे प्रबोधन करण्याचे आवाहन केले. आरोग्य सहायक एस. एस. सुतार, आरोग्य परिचर संजय गजरे हे उपस्थित होते. या रॅलीचे आयोजन रासयो कार्यक्रम अधिकारी प्रा. नवनिंद मुळूक, प्रा. योगेश दाढे, प्रा. रुपाली पायाळ यांनी केले.

### स्वच्छता दारी...

- 'स्वच्छता ठेवी दारी-डेंगी, मलेरिया पळे लांबी, मलेरियाविरोधी गोळी-कडी हिवतापाची टाळाटाळी, दैनंदिन तपासणी-करा तपासणी रक्ताची, कोरडा दिवस पाळा-रोगराई टाळा' अशा घोषणा रासयो स्वयंसेवकांनी दिल्या.

पुढारी
पुणे, मंगळवार
२९ ऑगस्ट २०१७

# मलेरिया, डेंग्यूबाबत रॅलीतून जनजागृती

राजगुरुनगर : प्रतिनिधी

खेड तालुक्यात डेंग्यू, मलेरिया, चिकुन गुनिया व तापांच्या साथीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन समाजाचे प्रबोधन करण्यासाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राजगुरू आरोग्य(?) आणि प्राथमिक आरोग्य केंद्र राजगुरुनगर यांच्या वतीने खेड तालुक्यात डेंग्यू, मलेरियाविरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. यात रासेयो विभागाचे २०० स्वयंसेवक सहभागी झाले.



डेंग्यू, मलेरियाविरोधी काढण्यात आलेली रॅली. (छाया : कौटीभाऊ पाचारणे)

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन झाले. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, नगरसेवक मनोहर सांडभोर, सचिन मधवे, प्रा. दिलीप मुळूक, गणेश देवखरकर आदी यावेळी उपस्थित होते.

अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी हवामानातील बदलांमुळे साथीच्या आजारांचे प्रमाण वाढले असून, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेसंदर्भात सर्वांनी काळजी घेण्याचे आवाहन करताना यामध्ये रासेयो स्वयंसेवकांनी समाजप्रबोधनात महत्त्वाची भूमिका पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महाविद्यालयापासून सुरू झालेली रॅली बस स्थानक, बाजारपेठ, नगरपरिषदमार्गे तहसील कार्यालयापर्यंत आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी घोषणा, पथनाट्याद्वारे जनजागृती केली. रॅलीच्या समारोपप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. उदय पवार यांनी साथीच्या आजारांचे निर्मूलन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावोगावी जाऊन लोकांचे प्रबोधन करण्याचे आवाहन केले. यावेळी आरोग्य सहायक एस. एस. मुळे, आरोग्य परिचर संपत गारगोटे उपस्थित होते.

'स्वच्छता ठेवी दारी, डेंग्यू, मलेरिया पळ काढी', 'क्लोरोक्विनची गोळी करी हिवतापाची राखरांगोळी', 'वेळ कमवून तपासणी, करा तपासणी रक्ताची', 'कोरडा दिवस पाळा रोगराई टाळा' अशा घोषणा रासेयो स्वयंसेवकांनी दिल्या. या रॅलीचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. रूपाली वायाळ यांनी केले.

सकाळ
पुणे, मंगळवार,
२९ ऑगस्ट २०१७
२

# राजगुरुनगरला डेंगी, मलेरिया जनजागृती फेरी

राजगुरुनगर, ता. २८ : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राजगुरुनगर नगर परिषद आणि प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या वतीने डेंगी, मलेरियाबाबत सोमवारी शहरातून जनजागृती फेरी काढण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजनेचे २०० स्वयंसेवक या फेरीत सहभागी झाले होते. फेरीचा प्रारंभ खेड शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, नगरसेवक मनोहर सांडभोर, सचिन मधवे, प्रा. दिलीप मुळूक, गणेश देवखरकर उपस्थित होते.



राजगुरुनगर (ता. खेड) : डेंगी, मलेरियाबाबत काढण्यात आलेल्या जनजागृती फेरीत सहभागी झालेले राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक.

महाविद्यालयापासून सुरू झालेली फेरी बसस्थानक, बाजारपेठ, नगर परिषदमार्गे तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी घोषणा, पथनाट्याद्वारे जनजागृती केली. 'स्वच्छता ठेवी दारी-डेंगी मलेरिया पळ काढी', 'क्लोरोक्विनची गोळी करी-हिवतापाची राखरांगोळी', 'वेळ कमवून तपासणी-करा तपासणी रक्ताची', 'कोरडा दिवस पाळा-रोगराई टाळा' अशा घोषणा स्वयंसेवकांनी दिल्या. या फेरीचे आयोजन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. रूपाली वायाळ यांनी केले.

प्रभात पुणे, मंगळवार, दि. २९ ऑगस्ट २०१७

# राजगुरूनगरात विद्यार्थ्यांकडून स्वच्छतेचा नारा

## राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या २०० स्वयंसेवकांचा सहभाग : जनजागृती घोषणांनी दुमदुमला परिसर

राजगुरूनगर, दि. २८ (प्रतिनिधी) - खेड तालुक्यात डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया व तापाच्या साथीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन शहरातील नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राजगुरू नगरपरिषद आणि प्राथमिक आरोग्य केंद्र राजगुरूनगर यांच्या वतीने ढोल-ताशांच्या गजरात डेंग्यू, मलेरिया विरोधी जनजागृती रॅलीचे सोमवारी (दि. २८) आयोजन केले. या उपक्रमातराष्ट्रीय सेवा योजना विभागाचे २०० स्वयंसेवक सहभागी झाले.

यावेळी 'स्वच्छता ठेवी दारी, डेंग्यू मलेरिया पळ काढी', 'करोडो दिवस पाळा, रोगराई टाळा' अशा घोषणा राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवकांनी दिल्या. या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

राजगुरूनगर शहरातील जवळपास सर्वच ठिकाणी डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया आणि तापाच्या साथीचे मोठ्या प्रमाणात रुग्ण आजारी पडले असून स्थानिक खासगी, सरकारी दवाखान्यात उपचार सुरू आहेत. या आजारांची जनजागृती करण्यासाठी राजगुरूनगर नगरपरिषद, प्राथमिक आरोग्य केंद्र, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त माध्यमातून राजगुरूनगर शहरातून जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीचा शुभारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, नगरसेवक मनोहर सांडभोर, सचिन मधवे, प्रा. दिलीप मुळूक, गणेश देवकर उपस्थित होते.

यावेळी अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, हवामानातील बदलांमुळे साथीच्या आजारांचे प्रमाण वाढले असून वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छते संदर्भात सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी समाजप्रबोधनात महत्वाची भूमिका पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. महाविद्यालयापासून सुरू झालेली रॅली बसस्थानक, बाजारपेठ, नगरपरिषद मार्गे तहसील कार्यालयापर्यंत काढली. यात विद्यार्थ्यांनी घोषणा, पथनाट्याद्वारे जनजागृती केली. रॅलीच्या समारोपप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. उदय पवार यांनी, साथीच्या आजारांचे निर्मूलन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावोगावी जाऊन लोकांचे प्रबोधन करावे, असे आवाहन केले. याप्रसंगी आरोग्य सहायक एस.एस.गुळसखे, आरोग्य परिचर संपत गारगोटे उपस्थित होते. यावेळी या रॅलीचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. रुपाली वायाळ यांनी केले.



राजगुरूनगर : नगरपरिषद, प्राथमिक आरोग्य केंद्र, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित जनजागृती रॅलीचे उद्घाटन करताना अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील आणि इतर.

१ ते ७ सप्टेंबर २०१७/४

# डेंग्यू, मलेरिया जनजागृती रॅली

## वैद्यकीय : राजगुरू महाविद्यालयातील 'रासेयो'तील २०० स्वयंसेवकांचा सहभाग

राजगुरूनगर (प्रतिनिधी) - खेड तालुक्यात डेंग्यू, मलेरिया, चिकून गुनिया व तापाच्या साथीचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन समाजाचे प्रबोधन करण्यासाठी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राजगुरू नगरपरिषद आणि प्राथमिक आरोग्य केंद्र राजगुरूनगर यांच्या वतीने ढोल-ताशांच्या गजरात डेंग्यू, मलेरिया विरोधी जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती. यात 'रासेयो' विभागाचे २०० स्वयंसेवक सहभागी झाले.

रॅलीचा शुभारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे



पाटील यांच्या हस्ते झाला. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, नगरसेवक मनोहर सांडभोर, सचिन मधवे, प्रा. दिलीप मुळूक, गणेश देवकर उपस्थित होते.

अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी हवामानातील बदलांमुळे साथीच्या आजारांचे प्रमाण वाढले असून, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेसंदर्भात सर्वांनी काळजी घेण्याचे आवाहन करताना यामध्ये 'रासेयो' स्वयंसेवकांनी समाज प्रबोधनात महत्वाची भूमिका पार पाडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

महाविद्यालयापासून सुरू झालेली रॅली बसस्थानक, बाजारपेठ, नगरपरिषदमार्गे तहसील कार्यालयापर्यंत आयोजित करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी घोषणा, पथनाट्याद्वारे जनजागृती केली. रॅलीच्या समारोपप्रसंगी बोलताना प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. उदय पवार यांनी साथीच्या आजारांचे निर्मूलन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी गावोगावी जाऊन लोकांचे प्रबोधन करण्याचे आवाहन केले. या वेळी आरोग्य सहायक एस. एस. गुळसखे, आरोग्य परिचर संपत गारगोटे उपस्थित होते.

या रॅलीचे संयोजन 'रासेयो' कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. रुपाली वायाळ यांनी केले.

खेड टाइम्स

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख